# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

**मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 03 व 05 कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्हचे" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" या मोहिमेचे आयोजन**

दिनांक 18 ऑक्टोबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" ही मोहीम राबविण्यात आली.

प्रभाग समिती क्रमांक 03 व 05 कार्यक्षेत्रातील मिरा रोड सेक्टर 5, पूनम सागर ब्रीज, मिरा रोड स्कायवॉक, हैदरी चौक, हनुमान मंदिर नवघर, विमल डेअरी, गोडदेव नाका, भाईंदर फाटक, जैन मंदिर ते जेसल पार्क इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता, शाळांची स्वच्छता व मल:निसारण केंद्रास भेट देऊन आवश्यक ते उपाययोजना करणे अशी असंख्य कामे सकाळी 8.00 वाजल्यापासून दुपारी 2.00 वाजेपर्यंत करून घेतली. सदर "दिपावलीपूर्व डीप क्लीन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या घराची तसेच आसपासच्या परिसराची नियमितरित्या स्वच्छता राखून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

"स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली" या मोहिमेत अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, अग्निशमन दल अधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner